मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

07 APR 2022

आवक क्रमांक 6924

# शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळसमोर, पुणे-४११ ००१.

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ ई मेल आय डी

dydpune@gmail.com वेब साईट- www.dydepune.com

जा.क्र. शिउसं/प्राथमिक-२०४/२०२१-२०२२/ 3480 दिनांक :- 6 APR 2022

प्रति,

मा.आयुक्त (शिक्षण) तथा अध्यक्ष, राज्यस्तरीय प्राधिकरण, मा.शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे -१.

विषय : महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ शाळा मान्यता पत्र मिळणेस्तव प्रस्ताव सादर करणेबाबत

**नमूना एक क्षेत्र स्तरीय प्राधिकरणाचा अहवाल**

श्री नारायण गुरु समिती, पुणे संचलित श्री. नारायण विद्यालय,गहुंजे साईनगर, ता.मावळ जि. पुणे

संदर्भ : १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई कडील महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा /(स्थापना व विनियमन) नियम २०२०, अधिसूचना दिनांक ५.१०.२०२०

२.मा.सहसचिव,शालेय शिक्षण विभागाकडील पत्र जा.क्र. एसएफएस- १०२१/प्र.क्र. ८५४/एसएम-२,दि.२२.१०.२०२१

३. क्षेत्र प्राधिकरण समिती,पुणे प्रपत्र ड अ.क्र. २५ दिनांक १.४.२०२२ च्या सभेतील मान्य प्रस्ताव

४..शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे यांचेकडील पत्र जा.क्र. शिक्षण/कावि/२०९९/२०२२,दि.१.४.२०२२

**महोदय,**

उपरोक्त विषयाबाबत सादर करणेत येते की, शासनाकडील संदर्भीय क्रमांक १ चे अधिसूचनेचे अनुषंगाने या कार्यालयाने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे तथा सदस्य,क्षेत्र प्राधिकरण,पुणे यांचेकडून समिती सदस्यांचे स्वाक्षरीसह दिलेल्या प्रस्तावानुसार या कार्यालयाने शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावाचे अनुषंगाने संदर्भीय क्रमांक २ व्दारे श्री नारायण गुरु समिती, पुणे संचलित श्री. नारायण विद्यालय,गहुंजे साईनगर, ता.मावळ जि. पुणे या इंग्रजी (इ. ६ वी ते इ. १२ वी ) सर्व शाखा या स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील दर्जावाढीने शाळा सुरु करणे करिता इरादापत्र शासनामार्फत निर्गमित झालेले आहे.

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनियमन नियम २०२० दिनांक ५.१०.२०२० मधील नियम क्रमांक ५ नुसार संदर्भीय क्रमांक ३ व्दारे उक्त शाळेस मान्यता मिळणेचे अनुषंगाने क्षेत्र स्तरीय प्राधिकरण समिती पुणे यांचे दि.१.४.२०२२ च्या सभेत प्रपत्र ड ,अ.क्र. २५ व्दारे मान्य प्रस्ताव शि.अ. (माध्यमिक ) जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून मूळ नस्तीसह या कार्यालयास संदर्भीय क्र. ४ व्दारे प्राप्त झालेला आहे. उक्त दर्जावाढ शाळेस मान्यता मिळणेस्तव मूळ नस्तीसह प्रस्ताव या पत्रासोबत खालील तपशिलानुसार सादर करीत आहोत. स्विकार व्हावा ही विनंती.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | दर्जावाढ शाळेचे नांव व ठिकाण | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | माध्यम | शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री नारायण गुरु समिती, पुणे | श्री. नारायण विद्यालय,गहुंजे साईनगर, ता.मावळ जि. पुणे | राज्यमंडळ | प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक इ. ६ वी ते इ. १२ वी सर्व शाखा | इंग्रजी | प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक इ. ६ वी ते इ. १२ वी सर्व शाखा स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर |

आपला विश्वासू

(औदुंबर उकरडे)

अध्यक्ष,क्षेत्रस्तरीय प्राधिकरण,तथा

शिक्षण उपसंचालक , पुणे विभाग, पुणे-१

**प्रत : माहितीस्तव सविनय सादर**

मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य पुणे तथा सदस्य ,राज्यस्तरीय प्राधिकरण

प्रत : शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांना माहितीस्तव रवाना